# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## जनसंपर्क विभाग
## कोटेशन नोटीस

नाशिक महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुक २०१७ चे आरक्षण सोडत कार्यक्रमासाठी महाकवी कालिदास कलामंदिर येथे एलईडी वॉल, प्रोजेक्टर व स्क्रिन इत्यादी साहित्य भाडेतत्वावर पुरविणेस अनुभवी व्यावसायिक यांचेकडून कोटेशन मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशिल | अंदाजे प्राकलन |
|---|---|---|
| १) | एलईडी वॉल, प्रोजेक्टर व स्क्रिन इत्यादी साहित्य भाडेतत्वावर पुरविणे. | ४५,०००/- |

### अटी/शर्ती

१) वरील कामाचे कोटेशन पत्रक (अटीशर्तीसह) www.nashikcorporation.in या संकेत स्थळावर दिनांक २८ /०९ /२०१६ ते दिनांक ०४ /१०/२०१६ या कालावधीत उपलब्ध आहे.

२) कोटेशन पाकिट सादरीकरणाची अंतिम मुदत दिनांक ०५ / १०/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त झालेले कोटेशन पाकिट स्विकारले जाणार नाही.

३) सदरचे साहित्य मनपा, स्थानिक संस्था कर विभाग, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, किंवा आदेशात नमुद केल्या ठिकाणी पोहोच करावे लागेल. त्यासाठी वेगळा वाहतुक खर्च देण्यात येणार नाही.

४) सदरचे दरपत्रकात सर्व करासह, मजुरीसह व खर्चासह दर नमुद करावयाचे आहेत. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.

५) कोणतेही कोटेशन स्विकारणे अगर नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील.

**Sd/-**
उपआयुक्त (जनसंपर्क विभाग)
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

## नाशिक महानगरपालिका, नाशिक

## जनसंपर्क विभाग : कोटेशन फॉर्म २०१६

**कामाचे नांव** : नाशिक महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुक २०१७ चे आरक्षण सोडत कार्यक्रमासाठी महाकवी कालिदास कलामंदिर येथे एलईडी वॉल, प्रोजेक्टर व स्क्रिन इत्यादी साहित्य भाडेतत्वावर पुरविणेस बाबत.

**कामाची मुदत** : ०६ महिने.

**कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत** : दिनांक ५ /१०/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत.

**कोटेशनधारकाचे नांव व पत्ता** : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**संपर्क क्रमांक** :

उपरोक्तप्रमाणे कामाचे अटीशर्ती व स्पेशिफिकेशननूसार साहित्य पुरविणेकामी मी/आम्ही पुढीलप्रमाणे सर्व करांसह दर सादर करीत आहोत.

| अ. क्र. | तपशिल | दर सर्व करासह रक्कम रुपये | प्रति युनिट |
|---|---|---|---|
| १ | प्रोजेक्टर सर्व अनंषगिक केबल व कनेक्शन सह (३५०० ल्युम) भाडेतत्वावर पुरविणे (२ नग) | | प्रती नग |
| २ | प्रोजेक्टर स्क्रीन (साईज ०६ * ०८ फुट, ट्रायपॉडसह) भाडेतत्वावर पुरविणे | | प्रती नग |
| ३ | एलईडी वॉल (साईज ८*८ फुट ) भाडेतत्वावर पुरविणे. | | प्रती नग |
| ४ | कॅमेरा (सर्वसाधारण) भाडेतत्वावर पुरविणे व त्याचे प्रक्षेपण एलईडी वॉलवर करणे. | | प्रती नग |
| ५ | मिक्सर (१नग) | | प्रती नग |
| ६ | एलईडी वॉल करीता प्लॅटफॉर्म सर्व साहीत्यासह भाडे तत्वावर पुरविणे व तयार करणे | | प्रती नग |

**(टिप :- उपरोक्त दरपत्रकात नमुद साहित्य वाहतुक खर्चासह, सर्व प्रकारच्या करासह तसेच ऑपरेटर व इतर सहाय्यक कर्मचा-यांसह दर नमुद करणे आवश्यक आहे. कोणत्याही खर्चाची व कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.)**

सदर कोटेशनसोबत असलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असुन मला त्या मान्य कालावधीकरीता पुरवठा करण्यास मी तयार आहे. त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे.

**दिनांक :- / /२०१६** **कोटशनधारकाची सही व शिक्का**

# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## जनसंपर्क विभाग
## सर्वसाधारण अटी शर्ती (कोटेशन)

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही. सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल.

२) कोटेशन नोटीस मध्ये नमुद केलेली संख्या ही अंदाजे असुन त्या मध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे.

३) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण मालाचा पुरवठा करणे/काम करणे/सेवा पुरविणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणास्तव मालाचा पुरवठा करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहील. तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतीम राहील.

४) ज्यांची संपुर्ण किंवा भागशः कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र.रु.१२०/- चे जनरल स्टॅम्पपेपर वर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल.

५) सेल्स टॅक्स, वाहतूक खर्च व इतर सर्व करांसह कोटेशन दर नमूद करावयाचे आहेत. कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

६) मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास/काम न केल्यास/सेवा न पुरविल्यास अशा उशिरा प्राप्त झालेल्या मालावर/केलेल्या कामावर/सेवा पुरविण्याच्या रक्कमेवर दर हजारी दर दिवसाला रु.१/- या प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडून वसुल करण्यात येईल.

७) सदरचे मंजूर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनूसार पुरवठा करणे बंधनकारक राहील.

८) एकुण बिलाच्या रक्कमेतून कामाचे स्वरुप विचारात घेता आवश्यकतेनूसार ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात येईल. मालाचा पुरवठा झाल्यानंतर सहा महिन्यापर्यंत मालाच्या दर्जाबाबत काही तक्रार न आल्यास मागणीनूसार सदरची रक्कम परत करण्यात येईल.

९) मुदतीत मालाचा पुरवठा न झाल्यास/मुदतीत काम पुर्ण न केल्यास सदरचा माल/काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहून करुन घेण्यात येईल. आणि त्या खरेदीस महानगरपालिकेस मंजूर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडून वसुल करण्यात येईल.

१०) मंजूर नमुन्याप्रमाणे/स्पेशिफिकेशनप्रमाणे मालाचा पुरवठा न झाल्यास/काम न झाल्यास सदरचा माल परत करण्यात येईल अथवा सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

११) कोणताही माल मंजूर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडून खरेदी करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही व याबाबत कोटेशनधारकास नुकसान भरपाई मागता येणार नाही.

१२) अटी/शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील.

१३) कोटेशन दर मंजूर झालेनंतर सदरच्या मालाच्या दरात/कामाच्या दरात/सेवेच्या दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही.

१४) सदरचे कामासाठी तात्पुरत्या कर्मचा-यांची नेमणुक करण्यात आली असेल किंवा त्यांची मदत घेतली असेल अशा कर्मचा-यांची नियमानुसार भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे नोंदणी करुन त्यांचा भविष्य निर्वाह निधी भरण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहिल.

**Sd/-**
**उपआयुक्त (जनसंपर्क विभाग)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

सदरचे अटीशर्ती मी वाचल्या असून सदरच्या अटीशर्ती मला मान्य व कबूल असून त्याप्रमाणे माल पुरविण्यास/सेवा पुरविण्यास/काम करण्यास मी तयार आहे. त्यासाठी स्वाक्षरी करत आहे

**कोटेशनधारकाची सही व शिक्का**